**ST. XAVIER'S TECHNICAL INSTITUTE, MAHIM**

Government Aided Autonomous Minority Institute, Approved by A.I.C.T.E. New Delhi

Mahim Causeway, Mumbai. Pin – 400 016

Phone: 24455937, 24454559; 24451961, 24460359 Fax: +91(22)2445 4482

E-mail: office@xaviertech.com

---

Ref No: XTECH/2021/EXAM/256 Date: 17th December 2021

# Instructions / Guidelines regarding conduction of the Winter 2021 Online Term End Examination

Reference:
1. MSBTE/D-40/LL/Winter exam21/2021/182 dated: 7th December 2021

With respect to the above reference, for maintaining the sanctity of academic expectations and integrity of examination process as well as ensuring the safety and security of the students, faculty and staff the guidelines mentioned in the circular *MSBTE/D-40/LL/Winter exam21/2021/182 dated: 7th December 2021* will be followed except the ones which are not applicable to our institute for the conduction of the Winter 2021 Term End Examination.

As the conduction of the examination will be in camera students/ examinee must keep their camera turned on during the complete session of the examination. The examinees are expected to appear for the examination in a clean, well lit surrounding wherein the examinees complete face shall be clearly visible. The examinee is not suppose to use any additional device for communication such as mobile, use of internet from other device, Bluetooth devices, headphones, smart devices etc. Contravention of all the mentioned conditions may lead to registration of malpractice against the examinee.

Detailed time table regarding the conduction of Winter 2021 Term end examination will be made available on our website later.

All the examiners, examinees, parents are requested to take note of the same.

Sd/-
Dr. S. B. Ghungrad
Principal and Chief Controller of Examination

**CC marked for information, circulation and appropriate action to:**

**Office** **CoE** **HoD** **Website**

# महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळ

(स्वायत्त) (ISO ९००१:२०१५) (ISO/IEC २७००१:२०१३)

शासकीय तंत्रनिकेतन इमारत, ४ था मजला, ४९, खेरवाडी, वांद्रे (पूर्व), मुंबई - ४०० ०५१

दू.क्र.: ०२२-६२५४२११०/१८८/१३२

संकेतस्थळ : www.msbte.org.in ई-मेल : secretary@msbte.com


जा.क्र. मरातंशिमं/का-४०/लले/हि.प.२१/२०२१/ १८२ दिनांक : - 7 DEC 2021

**महत्वाचे परिपत्रक**

प्रति,
प्राचार्य,
मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था.

**विषय :- हिवाळी परीक्षा २०२१ च्या आयोजनाबाबत.**

महाराष्ट्र राज्य तंत्र शिक्षण मंडळाशी संलग्नीत सर्व संस्थांकरीता हिवाळी परीक्षा २०२१ ची रुपरेषा व कार्यपध्दती याबाबत मंडळाच्या विद्वत समितीच्या दि.०३/१२/२०२१ रोजीच्या बैठकीत सविस्तर चर्चा करण्यात येऊन विद्वत समितीच्या शिफारशी व मान्यतेने हिवाळी २०२१ परीक्षेबाबतच्या ठळक बाबी मंडळाशी संलग्नीत सर्व संस्था, विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती व कार्यवाहीसाठी कळविण्यात येत आहे.

१. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची प्रात्यक्षिक परीक्षा ऑनलाईन प्रणालीचा वापर करुन तोंडी पध्दतीने मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार संस्थास्तरावर घेण्यात यावी. याकरिता विविध मिटींग ॲप्लिकेशनचा वापर करुन प्रात्यक्षिक परीक्षा घेण्यात यावी. शक्य नसल्यास टेलीफोनिक पध्दतीने सदर प्रात्यक्षिक परीक्षा संस्थास्तरावर घेण्यात यावी.

२. मंडळाशी संलग्नीत अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद मान्यताप्राप्त (अभियांत्रिकी व औषधनिर्माण) अभ्यासक्रमातील तसेच शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीचे (Non-AICTE) अभ्यासक्रमातील सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची लेखी परीक्षा Multiple Choice Question (MCQ) वापरुन ऑनलाईन पध्दतीने मंडळस्तरावर घेण्यात येईल. सदर परीक्षा विद्यार्थी Smart Mobile Phone/Laptop/Tablet/Desktop इत्यादीचा वापर करुन विद्यार्थी सद्यपरिस्थितीत ज्याठिकाणी वास्तव्यास आहेत त्या ठिकाणाहून देऊ शकतील. **सदर परीक्षेत विद्यार्थ्यांना ४० पैकी ३५ प्रश्न सोडविणे आवश्यक आहे. सदर परीक्षेकरिता विद्यार्थ्यांना ०२ तासाचा Slot देण्यात येईल. परीक्षेच्या वेळापत्रकात नमूद Slot मध्ये विद्यार्थ्यांनी परीक्षेकरिता Login करुन प्रत्यक्ष परीक्षा Start केल्यानंतर ०१ तासाचा परीक्षा कालावधी देण्यात येईल. हिवाळी परीक्षा २०२१ करीताचे ऑनलाईन लेखी परीक्षेचे वेळापत्रक लवकरच मंडळाच्या संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल. विद्यार्थ्याने Exam Start केल्यानंतर परीक्षेच्या कालावधीत कोणत्याही पध्दतीचा गैरमार्ग अवलंबणार नाही याची खातरजमा करण्याकरिता मंडळाने प्राधिकृत केलेल्या पर्यवेक्षकांमार्फत Online Proctoring (Monitoring) करण्यात येईल.** ऑनलाईन लेखी परीक्षेदरम्यान Online Proctoring (Monitoring) बाबतच्या सविस्तर सुचना व परीक्षेच्या कार्यप्रणालीबाबतच्या सविस्तर सुचना विद्यार्थी, संस्था व विभागीय कार्यालय यांना स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे देण्यात येतील.

३. ऑनलाईन Proctoring द्वारे नोंदविण्यात येणा-या गैरप्रकाराचे स्वरुप, विद्यार्थ्यांना देण्यात येणा-या सुचना व त्या अनुषंगाने गैरप्रकार प्रकरणी दोषी आढळून आलेल्या विद्यार्थ्यांना गैरप्रकार निहाय देण्यात येणा-या शिक्षा खालील तक्त्यात नमूद करण्यात येत आहेत. या बाबतची सविस्तर कार्यप्रणाली व सुचना विद्यार्थी व संस्था यांना स्वतंत्र परिपत्रकाद्वारे कळविण्यात येतील.

**MALPRACTICE CASES CORRESPONDING WARNINGS AND PUNISHMENTS AS PER SPECIAL COMMITTEE (SPC) RECOMMENDATIONS AND APPROVAL**

| Malpractice Number | Suspicious Action | Warning message | QUANTUM of PUISHMENT as per SPC Recommendations & approval |
|---|---|---|---|
| 1 | a) Examinee Not visible on camera due to bad or improper light | **You will be booked for malpractice if you do not adjust light so that your image is visible in the window on the examination screen.** | In case, the examinee fails to comply in spite of being warned for more than 3 times under Malpractice Number-1, during the online examination of a subject/course;<br>He / She shall be liable to a punishment of Cancellation of the performance of the examinee in that subject/course for the ongoing examination.<br>**Punishment Nomenclature : (Subject/Course)** |
| | b) Examinee not seen on the screen. | **You will be booked for malpractice if you are not seen on screen again.** | |
| | c) The camera turned away from the face of examinee | **You will be booked for malpractice if you do not correct camera position.** | |
| | d) Camera covered to obstruct vision. | **You will be booked for malpractice if you do not remove the cover over camera.** | |
| 2 | a) Examinee observed in possession and use of communication device / electronic gadget/ mobile phone / smart watch / tablet / I pad / earphone etc. during the examination | **You will be booked for malpractice if you are again seen in possession of electronic device / gadget not permitted during the examination.** | In case the examinee fails to comply even after being warned for more than 2 times under Malpractice Number-2, he/she shall be liable to a punishment of Cancellation of the performance of the examinee in that subject/course in the ongoing examination.<br>**Punishment Nomenclature : (Subject/Course)** |
| | b) Examinee observed in possession and referring to books, notes, web-sources or any other material or means to retrieve answers during the examination | **You will be booked for malpractice if you are again seen in possession of book/notes/web sources not permitted during the examination.** | |
| 3 | Additional person/s apart from the examinee is/are seen collaborating with examinee during the examination. | **You will be booked for malpractice if you are again seen with additional person/s during the examination.** | In case the examinee fails to comply even after being warned for more than 2 times under Malpractice Number-3, he/she shall be liable to a punishment of Cancellation of the performance of the examinee in all the subjects/courses for which he/she appeared in the current examination.<br>**Punishment Nomenclature: (1+0) (Applied on the Seat Number of the examinee.)** |

| | | | |
|---|---|---|---|
| 4 | A person other than the designated examinee as shown in photograph on the hall ticket is seen attempting the examination. | **You will be booked for serious malpractice of impersonation in the examination if person other than designated examinee is noticed on the screen again.** | In case the examinee fails to comply even after being warned once, he/she shall be liable to a punishment of Cancellation of the performance of the examinee in all the subjects/courses for which he/she appeared simultaneously, as regular/ex-student in the current examination. **Punishment Nomenclature: (1+0) (Applied on the enrollment Number of the examinee.)** |

४. खालील तक्त्यात नमुद विषयांच्या अभ्यासक्रमात Drawing चा समावेश असल्याने या विषयांची परिक्षा MCQ वापरुन घेणे शक्य नाही.

**(I) List of AICTE Courses Drawing Papers**

| Sr. No. | Drawing paper code | Paper Name |
|---|---|---|
| 1 | 17309 | BUILDING DRAWING |
| 2 | 17647 | CHEMICAL ENGINEERING DRAWING |
| 3 | 17923 | ENGINEERING DRAWING |
| 4 | 17940 | MECHANICAL ENGINEERING DRAWING |
| 5 | 22207 | ENGINEERING DRAWING |
| 6 | 22341 | MECHANICAL WORKING DRAWING |
| 7 | 22405 | BUILDING PLANNING AND DRAWING |

सदर विषयांची परीक्षा सत्रकर्म/अभ्यासक्रमावर आधारीत सादरीकरणाद्वारे ऑनलाईन पध्दतीने संस्थास्तरावर घेण्यात यावी. सदर सादरीकरण तसेच तोंडी प्रश्नोत्तरांच्या आधारे परिक्षक मुल्यांकन करतील. उपरोक्त नमुद केलेल्या Drawing विषयांची परीक्षा संस्थास्तरावर मुद्दा क्र.०९ मध्ये नमूद प्रात्यक्षिक परीक्षा कालावधी दरम्यान घेण्यात यावी.

५. ज्या विद्यार्थ्यांकडे ऑनलाईन लेखी परीक्षेकरिता इंटरनेट, संगणक, मोबाईल इ. सुविधा उपलब्ध नाहीत अथवा उपलब्ध होऊ शकणार नाहीत अशा विद्यार्थ्यांकरिता शेवटचा पर्याय म्हणुन ऑनलाईन परीक्षा नजिकच्या तंत्रनिकेतनात घेण्याची सुविधा उपलब्ध करुन देण्यात येईल. याकरिता नियोजन करण्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थी प्रवेशित असलेल्या संबंधीत संस्थेची असेल.

६. जे विद्यार्थी अपवादात्मक परिस्थितीत संस्थेत येऊन परीक्षा देतील त्यावेळी संस्था व विद्यार्थ्यांनी कोव्हिड-१९ बाबतच्या केंद्र व राज्यशासनाच्या सर्व मार्गदर्शक सुचनांचे काटेकोर पालन करावे.

७. दिव्यांग विद्यार्थ्यांकरिता नियमानुसार परीक्षेकरिता अधिकचा वेळ देण्यात येईल व संस्थांमार्फत अशा विद्यार्थ्यांना सोयीसुविधा पुरविण्यात याव्यात.

८. हिवाळी परीक्षा २०२१ चे स्वरुप ऑनलाईन पध्दतीने असल्यामुळे, परीक्षा विषयक नियमावलीतील RG11K नुसार Photocopy/Verification and Reassessment ची सुविधा हिवाळी परीक्षा २०२१ परीक्षेकरिता देण्यात येणार नाही.

९. **हिवाळी परीक्षा २०२१ प्रत्यक्षिक व लेखी परीक्षेचे वेळापत्रक खालीलप्रमाणेआहे.**

| WINTER 2021 Examination Schedule for AICTE and Pharmacy courses Students. | | | |
|---|---|---|---|
| **Sr. No.** | **Activities** | **Practical Exam** | **MCQ Based Online Theory Exam** |
| 1 | **Exam schedule for Regular and X Students of Yearly & Semester Pattern Courses.** *(Except Newly enrolled students in 1st and 3rd semester)* | January 03 - 12, 2022 | January 18 - February 09, 2022 |
| 2 | **Exam schedule for newly enrolled students in 1st and 3rd semester** | January 10 - 15, 2022 | |

१०. **शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा २०२१ परीक्षेबाबत महत्वाची सुचना.**
शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील (Non-AICTE) सर्व विद्यार्थ्यांची हिवाळी २०२१ परीक्षा मंडळस्तरावरच Online पध्दतीने घेण्यात येणार आहे. तथापि मंडळाचे परिपत्रक जा.क्र.मरातंशिमं/का-५३/अमुअ/२०२१-२२/७७०१, दि.२५/११/२०२१ नुसार नव्याने शासन मान्यता प्राप्त झालेल्या अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या सस्थांकरीता संलग्नतेची प्रक्रिया, विद्यार्थी प्रवेश, नोंदणी प्रक्रिया व हिवाळी परीक्षा २०२१ परीक्षा अर्ज भरण्याची प्रक्रिया सुरु आहे. सदर प्रक्रिया अद्याप पूर्ण झाली नसल्यामुळे शासन मान्यता प्राप्त अल्पमुदतीच्या अभ्यासक्रमातील सर्व विद्यार्थ्यांच्या हिवाळी परीक्षा २०२१ चा कालावधी अद्याप निश्चित करण्यात आलेला नाही. सदर परीक्षेचा कालावधी निश्चित करुन विद्यार्थी व संस्था यांना हिवाळी २०२१ च्या लेखी व प्रात्यक्षिक परीक्षेचे वेळापत्रक स्वतंत्रपणे परिपत्रकाद्वारे कळविण्यात येईल. शासन मान्यताप्राप्त अल्पमुदतीचे अभ्यासक्रम राबविणा-या संबंधीत संस्था प्रमुखांनी याची नोंद घ्यावी.

११. सर्व संस्थाप्रमुखांना सुचित करण्यात येते की, परीक्षेदरम्यान कोणताही गैरप्रकार होणार नाही याची दक्षता घ्यावी. परीक्षेदरम्यान गैरवर्तन झाल्यास मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीतील RG12 मधील तरतुदीनुसार तसेच मुद्दा क्र. ३ मधील QUANTUM of PUISHMENT नुसार कारवाई करण्यात येईल. याबाबत आपल्या संस्थेतील विद्यार्थी, अध्यापक व इतर कर्मचारी यांना अवगत करावे.

१२. मंडळाच्या परीक्षा विषयक नियमावलीनुसार हिवाळी २०२१ परीक्षेबाबतचे सर्व Records संस्थांनी त्यांचे स्तरावर जतन करुन ठेवावे.

१३. संस्थेच्या प्राचार्यांनी सर्व सत्र/वर्षातील विद्यार्थ्यांची हिवाळी परीक्षा २०२१ करिता वरील सर्व बाबी विद्यार्थी व त्यांचे पालक यांना अवगत करुन द्याव्यात. तसेच विद्यार्थ्यांना परीक्षांबाबत मार्गदर्शन करावे. परीक्षा सुरळीतपणे व विहीत कालावधीत पार पडेल याची दक्षता घेवुन आवश्यक ती कार्यवाही करावी. परीक्षा सुरळीतपणे पार पाडण्याची जबाबदारी सर्वस्वी संस्थेच्या प्राचार्यांची राहील याची नोंद घ्यावी.

(डॉ. महेंद्र रा. चितलांगे)
सचिव
महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहितीस्तव:-**

मा. संचालक, महाराष्ट्र राज्य तंत्रशिक्षण मंडळ, मुंबई

**प्रत माहिती व आवश्यक कार्यवाहीकरिता:-**

१. प्राचार्य, पदविका अभ्यासक्रम राबविण्या-या सर्व स्वायत्त संस्था.
२. उपसचिव, मंडळाचे विभागीय कार्यालय, मुंबई, पुणे, नागपुर , औरंगाबाद.